देवरूख शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# न्या.तात्यासाहेब आठल्ये कला, वेद. शं.रा.सप्रे वाणिज्य आणि विधिज्ञ दादासाहेब पित्रे विज्ञान महाविद्यालय

स्वर्गीय काकासाहेब पंडित शैक्षणिक संकुल, देवरुख
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी ४१५ ८०४
फोन.: ०२३५४-२६००५८, २६१०५८

पुनर्मूल्यांकन श्रेणी : 'A' (Third Cycle)

स्वायत्त महाविद्यालय




प्राचार्य

**डॉ. नरेंद्र तेंडोलकर**



मा. पालक बंधु-भगिनी,

सप्रेम नमस्कार,

पारतंत्र्याच्या कठीण कालखंडामध्ये १९२७ साली स्थापन झालेली देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ ही आपली संस्था 'राष्ट्र हे ईश्वर आणि राष्ट्रसेवा ही ईश्वर सेवा' या पवित्र तत्वाने देवरुख पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व मुल्य विकासाकरीता प्रामाणिकपणे कार्य करीत आहे. विद्यार्थी विकासासाठी व सामाजिक विकासासाठी संस्थेच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयाने एक महत्वाचे पाऊल उचलले आहे. संस्थेच्या आपल्या महाविद्यालयाने अतिशय परिश्रमपूर्वक व जबाबदारीने यु.जी.सी. या केंद्र सरकारच्या आयोगाकडुन 'स्वायत्त महाविद्यालय' म्हणून मान्यता मिळविली आहे.

मला सांगायला अतिशय आनंद वाटतो की, 'नॅक' समितीकडून महाविद्यालयाला मिळालेला 'अ' दर्जा, महाविद्यालयातील आधुनिक पायाभूत सुविधा, प्रबंधनाची आर्थिक सक्षमता, विद्यावाचस्पती व अर्हताप्राप्त प्राध्यापक वर्ग तसेच गेले अनेक वर्षाचे शैक्षणिक व सहशैक्षणिक यश या सर्व उपलब्धींचा साकल्याने विचार करुन यु.जी.सी. च्या उच्चाधिकार समितीने महाविद्यालयाला स्वायत्तता बहाल केली हा महाविद्यालयाचा, सर्व प्राध्यापकवृंदाचा तसेच संस्था प्रबंधनाचा गौरव आहे. तसेच स्वायत्त महाविद्यालय बनणारे आपले महाविद्यालय कोकणातील पहिलेच महाविद्यालय आहे.

परिसरातील आजच्या व भविष्यातील तरुण पिढीला घडविणे, त्यांचेमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे व त्यांना देशाचे जबाबदार नागरीक बनविणे हे आमचे उद्दीष्ट आहे. स्वायत्तता मिळाल्याने महाविद्यालयाला स्थानिक गरजा, भविष्यातील गरजा, कौशल्य विकास आदी विषयांचा समावेश अभ्यासक्रमात करण्याचे व याव्दारे विद्यार्थ्यांचे मुल्यवर्धन करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत त्यामुळे संस्था विद्यार्थी विकासाचे ध्येय अधिक प्रभावीपणे अंमलात आणू शकणार आहे.

आपण व आपले पाल्य या विकासयात्रेचा भाग बनणार आहात त्याबद्दल आपले अभिनंदन. आपल्या मौलिक सूचनांचा संस्था सकारात्मक विचार करेल याची खात्री देतो.

धन्यवाद!

आपला विश्वासू,

**सदानंद म. भागवत**
अध्यक्ष,
देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ



मा. विद्यार्थी-पालक बंधु/भगिनींनो,

या अत्यत हार्दिक प्रसंगी, आपण महाविद्यालयाला स्वायत्तता मिळावी म्हणून केलेल्या सहकार्याबद्दल अभिनंदन करतो. कोकणातील या चार जिल्ह्यात स्वायत्तता मिळविणारे हे आपले पहिले महाविद्यालय आहे. मला अभिमान वाटतो की विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या क्षमतांवर आणि गुणवत्तेवर विश्वास ठेवला. त्यासाठी मी विद्यार्थी, प्राध्यापक आणि व्यवस्थापनाचा आभारी आहे.

गेल्या दशकात आपले महाविद्यालय हे एक महत्त्वाचे महाविद्यालय म्हणून ओळखले जावू लागले आहे. स्वायत्ततेमुळे या डोंगराळ व मागास भागातील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट कामगिरीसाठी तयार करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. शिक्षणसंस्था आणि उद्योग यांच्यातील अपेक्षांची तफावत दूर करण्यासाठी आम्ही विद्यार्थ्यांना मदत करणार आहोत. आत्ताच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना, नवीन शैक्षणिक कार्यक्रम, जसे B.Sc., M.Sc. (संख्याशास्त्र, माहिती तंत्रज्ञान), B.S.W., M.S.W. (समाजशास्त्र), M.A. (भूगोल) अशा व्यावसायिक उपक्रमांचे उपयोजन विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या स्वायत्ततेमुळे २०१९-२० पासून शक्य झाले आहे.

आमचे शिक्षक विद्यार्थ्यांनी, त्यांनी आपले करिअर करावे, समाज व राष्ट्राला योगदान द्यावे यासाठी प्रयत्नशील आहेत. महाविद्यालयाने त्यासाठी मुल्यमापनात बदल केले आहेत. खेळ, एन.सी.सी., एन.एस.एस. कला, सामाजिक कार्य, परकीय भाषा यांतील अभ्यासक्रमांना जादाचे गुण देण्याचा मानस आहे.

स्वायत्ततेचा प्रमुख उद्देश हे या भागातील गरजांना अनुरुप शिक्षण व संशोधन यासाठी पूरक वातावरण निर्मिती हे आहे. उपलब्ध संधी, कौशल्ये यांचा विचार करुनच अभ्यासक्रमांची निर्मिती केली आहे. महाविद्यालय आपले उपयोजित संशोधन, तांत्रिक सहकार्य समाजातील अन्य संस्थांना, लोकप्रतिनिधिंना पुरवू शकते. सामाजिक आरोग्यासाठी महाविद्यालय एक केंद्रबिंदू म्हणून काम करु शकते. अधिक सखोलपणे महाविद्यालय हे खऱ्या यशाचा पाया असलेली मुल्ये, संस्कार, विश्वास व नातेसंबंध रुजवू शकते.

मला खात्री आहे की आमचे विद्यार्थी महाविद्यालयाची प्रतिष्ठा जपतील आणि झेंडा फडकवत ठेवतील.

मी सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी अंगीकारलेल्या उपक्रमांसाठी शुभेच्छा देतो.

**डॉ. नरेंद्र तेंडोलकर,** M.Sc., Ph.D.
प्राचार्य

स्वातंत्र्यपूर्व काळात १९२७ साली स्थापन झालेली देवरुख शिक्षण प्रसारक मंडळ ही संस्था कोकणातील एक जुनी व अग्रणी शिक्षण संस्था आहे. संस्थापक मा. कै. काकासाहेब पंडित यांनी न्यू इंग्लिश स्कूल देवरुख ही माध्यमिक प्रशाला स्थापन केली आणि १९७२ साली न्या. तात्यासाहेब आठल्ये यांनी कला व वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना केली. २००५ साली संगणक विज्ञान व २००९ साली जनरल/नैसर्गिक विज्ञान महाविद्यालयाचे महत्त्व जाणून विद्यमान अध्यक्ष श्री. सदानंद भागवत, तत्कालीन अध्यक्ष बाळासाहेब पित्रे व श्री. प्रकाश सप्रे समन्वयीनी आज पदव्युत्तर व विद्यावाचस्पती (Ph.D.) स्तरापर्यंत शिक्षणाची सोय उपलब्ध केली.

उच्चशिक्षणात होणारे अमूलाग्र बदल लक्षात घेऊन संस्थेने मोठ्या प्रमाणावर महाविद्यालयाचा विकास केला आहे ज्यामध्ये ग्रंथालय, ई-ग्रंथालय, अनेक विज्ञान प्रयोगशाळा, व्हर्चुअल क्लासरुम्स्, कार्यालयाचे संगणकीकरण, आंतरशाखीय संशोधन केंद्र अशा अनेक शैक्षणिक तसेच क्रीडासंकुल, एन.सी.सी., कला नैपुण्य आदि सहशैक्षणिक सुविधांचा समावेश आहे. महाविद्यालयाचे आत्तापर्यंत तीन वेळा नॅक मूल्यांकन झाले असून २०१४ साली झालेल्या मूल्यांकनामध्ये महाविद्यालयाला 'अ' श्रेणी प्राप्त झाली आहे. महाविद्यालयातील पायाभूत सुविधा, विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा तसेच संस्था प्रबंधनाची सक्षमता व आर्थिक स्थिती याचा विचार करुन यु.जी.सी.च्या उच्चाधिकार समितीने महाविद्यालयाला स्वायत्तता देण्याबाबत शिफारस केली व मंडळाने ती स्वीकारली.

## महाविद्यालयाला मिळालेले पुरस्कार

- मुंबई विद्यापीठाचा सर्वोकृष्ट महाविद्यालय पुरस्कार (२००९-१०).
- महिला विकास कार्यक्रम उत्कृष्टपणे राबविल्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून सलग दोन वर्षे 'जागर जाणिवांचा' पुरस्कार (२०१२-१३, २०१३-१४).
- मुंबई विद्यापीठाचा उत्कृष्ठ N.S.S. युनिट पुरस्कार.
- महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. पी. तेंडोलकर यांना मुंबई विद्यापीठाचा आदर्श शिक्षक पुरस्कार (२०१५-१६).
- महाविद्यालयातील कार्यालय अधिक्षक श्री. विवेक भोपटकर यांना मुंबई विद्यापीठाचा उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार.
- महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख, प्राध्यापिका सौ. स्नेहलता पुजारी यांना मुंबई विद्यापीठातर्फे सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार.
- महाविद्यालयातील भूगोल विभाग प्रमुख डॉ. सरदार पाटील यांना डेक्कन जिओग्राफिक असोसिएशन, पुणे तर्फे राज्यस्तरीय आदर्श भूगोल शिक्षक पुरस्कार.
- महाविद्यालयातील प्राध्यापक प्रताप नाईकवाडे यांना मुंबई विद्यापीठातील उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून मुंबई विद्यापीठातर्फे पुरस्कार.



महाराष्ट्र शासन 'जागर जाणिवांचा' पुरस्कार



मुंबई विद्यापीठाचा सर्वोकृष्ट महाविद्यालय पुरस्कार



मुंबई विद्यापीठाचा उत्कृष्ट शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार



मुंबई विद्यापीठाचा आदर्श शिक्षक पुरस्कार



मुंबई विद्यापीठातर्फे सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार



डॉ. प्रताप नाईकवाडे यांना तरुण संशोधक म्हणून पुरस्कार प्राप्त.

## महाविद्यालयाला मिळालेले संशोधनपर पुरस्कार

- महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रताप नाईकवाडे यांना अमेरिकेतील ॲरिझोना विद्यापीठात संशोधनासाठी भारत सरकारची प्रतिष्ठित 'रामन फेलोशिप'
- महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रताप नाईकवाडे यांना भारतीय विज्ञान परिषद कलकत्ता यांचेतर्फे तरुण संशोधक म्हणून पुरस्कार प्राप्त.
- महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रताप नाईकवाडे यांचा संशोधनातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सर्वोत्कृष्ट संशोधक म्हणून NITTFR, MHRD Govt. of India, चंदिगड येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत विशेष गौरव.
- डॉ. प्रताप नाईकवाडे यांचा अमेरिकेतील सॅन-फ्रॅन्सिस्को येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत उत्कृष्ट संशोधन सादरीकरण म्हणून पुरस्कार प्राप्त.
- महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील प्रा.डॉ.हेमंत चव्हाण यांना भारत सरकारच्या डिपार्टेट ऑफ सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी विभागातर्फे संशोधन प्रकल्प मंजूर रु.१५ लाख अनुदान मंजूर.
- महाविद्यालयातील पदार्थ विज्ञान विभागातील प्राध्यापिका डॉ. मीरा काळे चेन्नई येथील आय.आर.डी.पी. ग्रुप ऑफ जर्नल्स संस्थेर्फत संशोधनातील योगदानाबद्दल 'सी. व्ही. रामन' पुरस्कार.
- १२ प्राध्यापक पीएच.डी. प्राप्त. ६ प्राध्यापक पीएच.डी. अभ्यासवृत्तीवर.
- ६५० पेक्षा जास्त शोधनिबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेतून प्रसिध्द. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे व परिषदांचे आयोजन.
- बृहद भारतीय समाज न्यासाकडून १.२५ कोटी रुपये प्राप्त करुन आंतरशाखीय संशोधन केंद्राची उभारणी.
- ७ प्राध्यापक पीएच.डी. गाईड म्हणून मुंबई विद्यापीठाची मान्यता.
- मुंबई विद्यापीठ व विद्यापीठ अनुदान आयोग यांचे अनुदानातून ४० लघुसंशोधन प्रकल्प पूर्ण.

## अभ्यासक्रम


- पदवी विभाग - कला अभ्यासक्रम (Bachelor of Arts), वाणिज्य अभ्यासक्रम (Bachelor of Commerce), संगणक विज्ञान अभ्यासक्रम (Bachelor of Computer Science) आणि विज्ञान- भौतिकशास्त्र अभ्यासक्रम (Bachelor of Science - Physics) आणि विज्ञान - रसायनशास्त्र अभ्यासक्रम (Bachelor of Science - Chemistry).
- पदव्युत्तर विभाग- M.Sc. Physics, M.Sc. Organic Chemistry & M.Sc. Analytical Chemistry.
- रसायनशास्त्र प्रयोगशाळेला पी.एच.डी. केंद्र म्हणून मुंबई विद्यापीठाची मान्यता.
- महाविद्यालय व गोएथ इन्स्टिट्यूट, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने जर्मन भाषा अभ्यासकेंद्र.
- प्रत्येक विषयाशी निगडीत प्रमाणपत्र अभ्यासक्रम.
- N.C.C. नेव्हल युनिट (विद्यार्थी संख्या ५०)
- N.S.S. युनिट (विद्यार्थी संख्या २५०)

## पायाभुत सुविधा

- अद्ययावत प्रयोगशाळा (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, संगणकशास्त्र व भूगोल).
- अद्ययावत ग्रंथालय, ४०,००० पेक्षा जास्त ग्रंथसंपदा.
- ५० पेक्षा जास्त संगणक व इंटरनेट सुविधा असलेली संगणक प्रयोगशाळा.
- ४०० मीटर ८ लेन रनिंग ट्रॅक.
- सुसज्ज इनडोर स्टेडियम.
- बास्केटबॉल, बॅडमिंटन, हॉकी, शुटिंग यासारख्या खेळांसाठी सुसज्ज कोर्ट.
- अद्ययावत व्यायामशाळा.
- दोन सेमिनार हॉल.
- सर्व सोईंयुक्त कॅन्टीन.
- संपूर्ण परिसर सौर ऊर्जेवर.


रसायनशास्त्र प्रयोगशाळा १


रसायनशास्त्र प्रयोगशाळा २


इंग्रजी भाषा प्रयोगशाळा


संगणक विज्ञान प्रयोगशाळा



डॉ. सुलभा आपटे क्रीडा अकादमी



सुसज्ज बॅडमिंटन कोर्ट



सुसज्ज शुटिंग रेंज




शहिद जवान स्मारक



स्व. लक्ष्मीबाई पित्रे कलासंग्रहालय

## विद्यार्थी प्रगती

- पदवी व पदव्युत्तर परिक्षांमध्ये सातत्याने उत्तम निकाल.
- वाणिज्य विभागातील विद्यार्थी सातत्याने मुंबई विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत.
- विद्यार्थ्यांकडून विविध संशोधन प्रकल्प पूर्ण आणि विद्यापीठ स्तरावर त्यांस पुरस्कार.
- तायक्वांदो-हॉकी यासारख्या क्रीडा प्रकारात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यार्थ्यांची निवड.
- ललितकला व अन्य प्रकारात विद्यापीठ आणि राष्ट्रीय पातळीवर, विद्यार्थ्यांना सुवर्णपदके.
- एन.सी.सी. छात्र राजेंद्र सावंत याची प्रजासत्ताक दिन संचलन (दिल्ली) साठी निवड.

## महाविद्यालय आणि समाज

- महाविद्यालय हा समाजाचा एक घटक असल्याने समाजाचे आम्ही ऋणी आहोत, या भावनेने आणि आपण समाजाला काही देणे लागतो या जबाबदारीच्या जाणीवेतून महाविद्यालयाकडून उनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. ज्यामध्ये बंधारा निर्मिती, एड्स, मतदान जनजागृती, देवराई संवर्धन, कार्बन मोजणी, शालेय विद्यार्थी गुणवत्ता वर्धन, स्त्री आरोग्य सुविधा प्रकल्प, पर्यावरण रक्षण प्रकल्प, नैसर्गिक शेती सल्ला केंद्र अशा अनेक उपक्रमांतून सामाजिक ऋण फेडण्याचा प्रयत्न महाविद्यालय करीत आहे.

## स्वायत्तता

- विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या (NAAC) या राष्ट्रीय संस्थेकडून झालेल्या मुल्यमापनात 'अ' दर्जा प्राप्त व सर्वांगाने विशेष गुणवत्ता सिध्द केलेल्या महाविद्यालयांनाच स्वायत्तता दर्जा.
- संस्थेची सक्षमता व आर्थिक स्थिती, महाविद्यालयाची अर्हता व शैक्षणिक आलेख लक्षात घेऊन महाविद्यालयाची विशेष गुणवत्ता सिध्द झाल्याने स्वायत्तता दर्जा बहाल.
- मुंबई विद्यापीठाशी संलग्न राहून अभ्यासक्रमांत योग्य ते बदल करणे, व्यवहार्य संशोधन प्रकल्प राबविणे, स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्था, उद्योग यांच्या संयुक्त विद्यमाने -उद्योजकता, रोजगार निर्मिती करणे असे विद्यार्थी हिताचे उपक्रम राबविणे स्वायत्ततेमुळे शक्य.
- कोकणातील पर्यावरणाचे रक्षण, रोजगार निर्मिती, उद्योजकता आणि सामाजिक हितासाठी संशोधन हे मुद्दे केंद्रस्थानी ठेवून महाविद्यालय कार्यरत.
- महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, व्यक्तिमत्व, विकास, वेळेवर निकाल अशा अनेक हेतूंनी स्वायत्ततेचा निर्णय.
- महाविद्यालयाला अभ्यासक्रम व परीक्षापध्दतीत आवश्यक ते बदल करण्याचे स्वातंत्र असले तरीही विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाचेच पदवी प्रमाणपत्र.
- मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन, अन्य विद्यापीठे, शिक्षण तज्ज्ञ व व्यवसाय क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणा-या संस्था अशा विविध प्राधिकरणांधुन साधारण ३५ तज्ज्ञ महाविद्यालयाच्या कार्यकारणीवर नियुक्त
- स्वायत्तता मिळविणारे कोकणातीलपहिले,मुंबई विद्यापीठातील २१ वे आणि महाराष्ट्रातील ५७ वे महाविद्यालय.

## भविष्यवेध

- आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संस्थांबरोबर संलग्न होउन दर्जात्मक अभ्यासक्रमांची निर्मिती आणि अंमलबजावणी.
- उद्योजकता, स्वयंरोजगार या दृष्टीकोणातून विद्यार्थी विकासावर लक्ष केंद्रीत करण्याचा प्रयत्न.
- कोकणातील विद्यार्थ्यांच्या विशेष शैक्षणिक गरजा विचारात घेउन अभ्यासक्रमांची रचना केली जाणार आहे.
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञांच्या ज्ञानाचा फायदा व्हावा या हेतूने उपक्रमांची, अभ्यासक्रमांची मांडणी व अंमलबजावणी आणि तज्ज्ञ व्यक्तींना महाविद्यालयातील अभ्यास मंडळ, व्यवस्थापन मंडळ यामध्ये विशेष स्थान.
  कोकणच्या गरजां/समस्या सोडविण्यासाठी संशोधन.
- पर्यावरण रक्षण उपक्रम.
- कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेत शिकणाऱ्या हुशार व होतकरु विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान, संगणक क्षेत्रात पदव्युत्तर स्तरापर्यंत शिक्षण उपलब्ध करण्याचा मानस.



राष्ट्रीय छात्रसेना (नौदल)



स.का.पाटील अंतरशाखीय संशोधन केंद्र